राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथील निवासी व अनिवासी इमारतींचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करण्यासाठी रु.३२,५१,१७९ च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राकायो-२०१६/प्र.क्र.१९२/राकावि-२

नविन मंत्रालय, गोकूळदास तेजपाल रुग्णालय, संकूल इमारत
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई.
दिनांक : १६ नाव्हेंबर, २०१७.

वाचा -

१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक.१७.०४.२०१५
२) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे पत्र क्र.आयुक्त/राकावियो/का.क्र.०९/८१०८-११/२०१६, दिनांक १४.०३.२०१६
३) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे अ.शा.पत्र क्र.आयुक्त/राकावियो/का.क्र.९/ राकावियो मुलुंड/१५९५३/२०१७, दिनांक २६.१०.२०१७.
४) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांचे पत्र क्र.आयुक्त/राकावियो/का.क्र.०९/ विशेषदुरुस्ती/१६५४०/२०१७, दिनांक १५.११.२०१७.

प्रस्तावना -

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड हे सन १९७१ मध्ये बांधण्यात आले असून सदर रुग्णालयाच्या आवारात २२ निवासी व ११ अनिवासी इमारती आहेत. रुग्णालय परिसरात राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तक्रार केली होती की, ते राहत असलेल्या इमारती मधील कॉलममधील स्टील उघडे पडले असून इमारतींना धोका निर्माण झाला आहे. यास्तव सदर इमारतींचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना यांच्या संदर्भाधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुलुंड येथील निवासी व अनिवासी इमारतींचे संरचनात्मक परिक्षण

(Structural Audit) करण्यासाठी रुपये.३२,५१,१७९/- (अक्षरी रुपये बत्तीस लाख एक्कावन्न हजार एकशे एकोणऐंशी फक्त) खर्चास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) हे सार्वजनिक बांधकाम विभागाने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत करण्यात यावे.

हा खर्च खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

मागणी क्र.आर-१

मुख्य लेखाशिर्ष -

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०१ - नागरी आरोग्य सेवा विषम चिकीत्सा

१०२ - राज्य कामगार विमा योजना

(०१)(०३) राज्य कामगार विमा योजना रुग्णालये

(२२१० १४०२) २७ - लहान बांधकामे.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग पाच मधील अ.क्र.३, नियम क्र.१३४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१७३६१७०९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R More

Digitally signed by Sanjay R More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7256abb8dd472637941e581488fb02eda9e0d6b701c434bcf471a0d525f80681, cn=Sanjay R More
Date: 2017.11.17 12:21:08 +05'30'

संजय रा.मोरे

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,मुंबई.

२. संचालक (वैद्यकीय) / (प्रशासन) राज्य कामगार विमा योजना, मुंबई .

३. वैद्यकीय अधिक्षक ,राज्य कामगार विमा योजना रुग्णालय , मुलूंड.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. निवड नस्ती (राकावि-२).